**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः 22.12.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन संस्थगित;

राज्यातील विकास प्रकल्पांचा विभागवार आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून विधानसभेत सादर;

राज्य मंत्रीमंडळाचं बहुचर्चित खातेवाटप जाहीर

मनुकांना कृषी उत्पादनाचा दर्जा – वस्तू आणि सेवा कर परिषदेत महाराष्ट्राची मागणी मान्य आणि,

मन:शांती आणि सुसंवाद साधण्याचा मार्ग सांगणारा पहिला जागतिक ध्यान धारणा दिवस जगभरात उत्साहात साजरा

**विधिमंडळ**

विधीमंडळाच्या नागपूरमध्ये सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज काल संस्थगित करण्यात आलं. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या कामकाजाचा आढावा सभागृहासमोर मांडला. अधिवेशन कालावधीत 13 विधेयकं संमत तर 15 विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आल्याची माहिती नार्वेकर यांनी दिली.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील मागास भागासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधत राज्यातल्या जनतेला न्याय देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.

वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प येत्या सात वर्षात मार्गी लावणार आहे. 88 हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे विदर्भातली 10 लाख एकर जमीन ओलिताखाली येणार असल्याचं फडणवीस यांनी

सांगितलं. गडचिरोली – चंद्रपूर – वर्धा – भंडारा - नागपूर या भागात होत असलेल्या विविध औद्योगिक प्रकल्पांची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जवळपास 16 हजार कोटी रुपयांचा निधी देण्यात आल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. सोयाबीन आणि कापूस उत्पादकाला योग्य मदत दिली जात असून राज्यात 557 हमी भाव खरेदी केंद्रावर आतापर्यंत जवळपास 24 लाख क्विंटल सोयाबीनची खरेदी करण्यात आली आहे, असं ते म्हणाले.

अलमट्टी धरणाच्या उंचीचा प्रश्न चर्चेत असून कोल्हापूर, सांगली इथला शेतकरी, सामान्य नागरिक यांची जिवित हानी, मालमत्ता नुकसान होणार नाही यासाठी राज्य सरकार योग्य ती खबरदारी घेईल, असं ते म्हणाले.

कोकणाच्या विकासासाठी कोकण विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आलं असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत दिली. कोकणातून वाहून जाणाऱ्या 65 टीएमसी पाण्याचा उपयोग करण्यासाठी लहान, मोठे बंधारे बांधण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी, सागरी किनारा रस्ता, 8 नवे पूल आणि मुंबई ते सिंधुदुर्ग प्रवेश नियंत्रीत हरीत महामार्ग यांच्या माध्यमातून कोकणाचा विकास साधला जाईल, असं शिंदे म्हणाले.

बेघर आणि मुंबई बाहेर गेलेल्या नागरिकांना मुंबईत हक्काचे घर मिळवून देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानपरिषदेत दिली. प्रविण दरेकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावरील चर्चेदरम्यान ते बोलत होते.

पुण्यातले आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत पुरवणी मागण्यांच्या संदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान खडक पोलीस वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रश्न मांडला. पोलीसांच्या घरांविषयी सरकार सकारात्मक आहे. दुरावस्थेत असलेल्या पोलीस वसाहतींचा विकास करण्यात येईल, असं शिंदे यांनी सांगितलं.इंदूमिल परिसरामधील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं स्मारक पुढील वर्षी 6 डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली. मार्च 2025 पर्यंत नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार शिंदे यांनी व्यक्त केला. विदर्भासह महाराष्ट्राच्या औद्यीगिक प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला. नदीजोड प्रकल्प, वस्त्रोद्योगाला चालना, जलयुक्त शिवाराच्या माध्यमातून सिंचन, सोयाबीन तसंच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा अश्या विविध विषयांवर त्यांनी शासनाच्या विकासाच्या दिशेनं करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. या पुढील अधिवेशन अर्थसंकल्पीय अधिवेशन असून ते 3 मार्चपासून मुंबईत सुरु होईल.

**खातेवाटप**
राज्य मंत्रीमंडळाचं बहुचर्चित खातेवाटप काल जाहीर करण्यात आलं. याबाबतचं पत्रक राजभवनातून प्रकाशित करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृह, उर्जा, कायदा आणि न्यायव्यवस्था, सामान्य प्रशासन, माहिती ह्या विभागांचा कार्यभार सांभाळणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास, गृहबांधणी आणि सार्वजनिक बांधकाम हे विभाग राहणार असून अर्थ, नियोजन आणि उत्पादन शुल्क हे विभाग उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आले आहेत. चंद्रशेखर बावनकुळे हे महसूल, हसन मुश्रीफ वैद्यकीय शिक्षण तर चंद्रकांत पाटील उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री असतील. माणिकराव कोकाटे यांना कृषी, जयकुमार गोरे यांना ग्रामविकास आणि पंचायत राज तर पंकजा मुंडे यांना पर्यावरण आणि हवामान बदल तसंच पशुपालन विभाग देण्यात आले आहेत.

**मनुका**
द्राक्षापासून तयार होणाऱ्या मनुक्याला कृषी उत्पादनाचा दर्जा देत वस्तू आणि सेवा करातून वगळण्याच्या महाराष्ट्राच्या मागणीला यश आलं आहे. जैसलमेर इथं काल झालेल्या वस्तू सेवा कर परिषदेतमध्ये हळद आणि गूळ याप्रमाणेच मनुका करमुक्त करण्यास मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

**अर्थ संकल्प पूर्वबैठक**
भारताच्या पाच ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट करताना महाराष्ट्र देशात अग्रेसर राहील, अशी ग्वाही मंत्री आदिती तटकरे यांनी काल जैसलमेर इथं झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पपूर्व बैठकीत दिली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत 2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील निधी वाटप, दृष्टिक्षेप आणि विविध मागण्यांवर राज्यांच्या अर्थमंत्र्यांमध्ये चर्चा झाली, त्यावेळी तटकरे बोलत होत्या. तटकरे यांनी राज्यातील कृषी, आरोग्य, पायाभूत सुविधा यांसह विविध विकास धोरणांबाबत शासनाच्या प्रस्तावांची रूपरेषा मांडली.

**क्षयमुक्तभारत**
देशभरात राबवण्यात येत असलेलं क्षयमुक्त भारत अभियान यशस्वी होण्यासाठी क्षयरोग रुग्णांच्या समुपदेशनासह जनजागृतीही महत्वाची असल्याचं मत मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केलं. क्षयमुक्त भारत अभियानाबाबत केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या अध्यक्षतेखाली काल दूरस्थ पद्धतीनं देशभरातील सर्व मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांची बैठक झाली. त्यावेळी महाजन बोलत होते.

31डिसेंबर

गडकिल्ल्यांच संवर्धन करण्याबरोबरच ऐतिहासिक वास्तूंचं पावित्र्य राखण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयातल्या कुडाळ तालुक्यातल्या नारुर गावच्या तरुणांनी पुढाकार घेतला आहे. 31 डिसेंबर रोजी गडाचं पावित्र्य जपण्यासाठी सज्ज झालेल्या या तरुणाईविषयी आमच्या प्रतिनिधीकडून... गडकिल्ल्यांच संवर्धन करण्याबरोबरच या ऐतिहासिक वास्तूचं पावित्र्य राखण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हयातल्या कुडाळ तालुक्यातल्या नारुर गावच्या तरुणांनी पुढाकार घेतला आहे. नारुर ग्रामविकास प्रतिष्ठान आणि शिवप्रेमी सिंधुदुर्ग या संस्थांच्या माध्यमातून 31 डिसेंबरला गडावर होणाऱ्या मद्य पार्ट्यांवर या संस्थांची करडी नजर राहणार आहे. त्यासाठी संपूर्ण रात्रभर खडा पहारा देऊन अशा अनिष्ठ गोष्टी गडावर होणार नाहीत याकडे यांचं लक्ष असणार आहे. शिवछत्रपतीचं वास्तव्य लाभलेला किल्ले रांगणागड हा सिंधुदुर्ग आणि कोल्हापूरच्या सीमेवर आहे. हा गड कोल्हापूर जिल्ह्यात येत असला तरी सिंधुदुर्ग जिल्ह्यात सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या नारुर गावापासून काही अंतरावरच हा गड आहे. गेल्या काही दिवसांपासून गडावर पर्यटकांचा ओघ वाढला आहे. या पर्यटकांत शिवप्रेमी पर्यटक मोठ्या संख्येनं असले तरी काही हुल्लडबाज पर्यटकांकडून मद्य पार्ट्या करण्याचं प्रमाण वाढलं आहे. त्याला आळा घालून गडाचं पावित्र्य जपण्यासाठी 31 डिसेंबरच्या रात्री खडा पहारा द्यायला नारुर ग्रामविकास प्रतिष्ठानचे शिलेदार सज्ज झाले आहेत. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, निलेश जोशी, सिंधुदुर्ग.

**अजमेरा**

भारतीय निवडणुकांच्या संचालनासाठी उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल, नागरिकांच्या सहभागासाठी यावर्षीचा आंतरराष्ट्रीय निवडणूक पुरस्कार सनदी अधिकारी संतोष अजमेरा यांना जाहीर झाला आहे. युकेमधील इंटरनॅशनल सेंटर फॉर पार्लमेंटरी स्टडीजद्वारे हा पुरस्कार दिला जातो. अजमेरा हे महाराष्ट्राच्या तुकडीतले अधिकारी असून सध्या ते केंद्रीय लोकसेवा आयोगात संयुक्त सचिव म्हणून कार्यरत आहेत.

**सुशासन सप्ताह**

सुशासन सप्ताहाचं यंदाचं घोषवाक्य “प्रशासन गाव की ओर” हे असून शासकीय योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचाव्या यासाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. बुलडाणा जिल्ह्यात मौजे कोथळी आणि खराबडी इथं दिव्यांग लाभार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्याकडून विविध योजनांच्या अंतर्गत मिळणाऱ्या लाभाची माहिती देण्यात आली आणि अर्ज भरून घेण्यात आले. धुळे जिल्ह्यात मत्स्यव्यवसाय कार्यालयामार्फत जिल्ह्यातल्या सर्व मत्स्यपालन सहकारी संस्थाची एक दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली. मत्स्यव्यवसाय विभागातल्या विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली.

**ध्यान धारणा**

जगभरात काल ध्यानधारणा दिन साजरा करण्यात आला. मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी ध्यानाच्या परिवर्तनीय शक्तीवर भर देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघानं 21 डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय ध्यानधारणा दिन जाहीर केला आहे. भारताचे राष्ट्रसंघातील प्रतिनिधी पी. हरीश यांनी ध्यान या प्राचीन भारतीय पद्धतीवर प्रकाश टाकला.

ध्यान हा आपल्या जीवनशैलीचा एक भाग असू द्या, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना दिला आहे. मन:शांती आणि सुसंवाद यासाठी ध्यान हा उत्तम मार्ग असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**ध्यान धारणा**

पुण्यातल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी या संस्थेमध्ये पहिल्या ध्यान दिनी साधकांनी चिंतन, चिंतन आणि उपक्रमातून ध्यानाचं महत्त्व अनुभवलं. ज्येष्ठ मानववंशशास्त्रज्ञ आणि गांधीवादी प्रा. आर. च्या. मुटाटकर लिखित 'रामायण' या पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीचं प्रकाशन यावेळी करण्यात आलं. मुटाटकर यांनी 'रामायण' या ग्रंथाचा सारांश आणि सद्यस्थितीत त्याचं महत्त्व सांगितलं.

**हवामान**

राज्यात काल बहुतांश ठिकाणी किमान तापमान 15 अंशांच्या वर होतं. आज हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**